<u>महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२</u>

राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२३१/क्रीयुसे-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १३ फेब्रुवारी, २०१४.

**<u>वाचा -</u>**

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/क्रीयुसे-१ दि. १४ जून, २०१२

**<u>प्रस्तावना -</u>**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन अनेक वर्षापासून प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीने राज्याचे स्वतंत्र क्रीडा धोरण १९९६ मध्ये जाहीर करण्यात आले. अशा प्रकारे क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. त्यामध्ये वेळोवेळी परिस्थितीनुसार झालेले क्रीडा बदल विचारात घेऊन सन २००१ मध्ये सुधारित धोरण निश्चित करून क्रीडा विकासाच्या भरीव योजनांची आखणी करण्यात आली. त्याचा दृश्य परिणाम दिसून महाराष्ट्राचा क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य राज्य म्हणून नावलौकीक झाला. दरम्यानच्या कालावधीत आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा विश्वात झालेले बदल विचारात घेऊन व क्रीडा क्षेत्रात राज्याचा नावलौकीक कायम ठेवण्यासाठी अद्ययावत क्रीडा धोरण करण्याची गरज निर्माण झाली. राज्यातील खेळांडूनी आंतराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करून पदक विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाडुंच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार पायाभूत सुविधा, खेळाडूंचा गौरव, क्रीडा प्रशिक्षकांना अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख या बाबी विचारात घेवून क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक १४.६.२०१२ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

२. राज्याच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या क्रीडाविषयक कामगिरीमुळे देशाच्या व राज्याच्या नावलौकीकात भर पडत आहे. खेळाडू घडविण्यासाठी खेळाच्या पायाभूत सुविधा, क्रीडा मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, सराव व प्रशिक्षणासाठी पुरेसे साहित्य, प्रशिक्षणाचा कृती आराखडा, खेळातील कौशल्यांवर प्रभुत्व येण्यासाठी सराव, नियमित प्रशिक्षण, स्पर्धा, खेळाडूंच्या सकारात्मक मानसिकतेसाठी मानसोपचार तज्ञांचे मार्गदर्शन, आहार तज्ञ, मसाजिस्ट, दुखापतीवर इलाजासाठी फिजीओथेरपीस्ट इ.बाबींचे मार्गदर्शन खेळाडूंना पुरविणे आवश्यक आहे.

जागतिक नामांकित स्पर्धांमध्ये नवनवीन उच्चांक प्रस्थापित होतात तसेच विविध तंत्रांच्या आधुनिक उपकरणांचा वापर करुन खेळाडूंची कामगिरी उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंसाठी दर्जेदार नामांकित प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, समतोल आहार तसेच नियमित प्रशिक्षण या गोष्टींवर लक्ष केंद्रीत करुन प्रशिक्षणाचा कृती कार्यक्रम हाती घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

१. **या योजनेस “क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन”**, असे संबोधण्यात यावे.

२. **उद्दिष्ट :-**

**क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे प्रमुख उद्दिष्ट पुढीलप्रमाणे राहतील :-**

- खेळामधील अद्ययावत कौशल्य विकसीत करणे.
- खेळातील क्लुप्ती (Strategy & Tactics)
- कामगिरीचे मुल्यमापन. (Performance analysis)
- शारीरिक तंदुरुस्तीचे मुल्यमापन.( Fitness analysis)

३. **शिबिराचे आयोजक**

विभागीय उपसंचालक व संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी शिबिराचे आयोजन करावे.

४. **शिबिराचे स्थळ**

सदरची शिबिरे शासनाच्या तालुका / जिल्हा / विभागीय क्रीडा संकुल /शिवछत्रपती क्रीडा नगरी म्हाळूंगे बालेवाडी, पुणे येथे घेण्यात यावीत.

५. **खेळाडू/प्रशिक्षणार्थींची पात्रता :-**

i. प्रशिक्षणार्थी खेळाडूंची निवड करताना राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी / प्राविण्य प्राप्त खेळाडू राज्यस्तर स्पर्धेतील प्राविण्यधारक यांचे नंतर उदयोन्मुख खेळाडूंना प्राथम्य द्यावे.

ii. प्रस्तावित शिबिरांसाठी पात्र ठरणा-या खेळाडूंनी मागील वर्षात राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेला असल्यास, तो महाराष्ट्र राज्याच्या संघाकडून घेतलेला असावा.

iii. राज्यातील खालील नमूद १५ खेळ प्रकारांच्या राज्यातील निकालाबाबत अधिकृत एकविध खेळ संघटनेने स्पर्धा समाप्त झाल्यानंतर १ महिन्यात यादी सादर करावी अन्यथा त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही. भारतीय शालेय खेळ महासंघाच्या १७ व १९ वर्षे वयोगटातील खालील नमूद १५ खेळ प्रकारातील राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी व राज्य स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त खेळाडू.

६. **शिबिर मार्गदर्शकाची पात्रता:-**

सदर शिबिरामध्ये खेळाडूना प्रशिक्षण देण्यासाठी राज्य शासनाच्या सेवेमध्ये त्या त्या खेळाचे एन.आय.एस. धारक मार्गदर्शक/ शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू / उत्कृष्ट मार्गदर्शक, किंवा साईच्या पॅनलवरील मार्गदर्शक यांची नियुक्ती करण्याचा अधिकार आयुक्त / संचालक यांना राहील.

एका शिबिरासाठी मुख्य मार्गदर्शक रु. २०,०००/- व सहाय्यक मार्गदर्शकरु.१५,०००/- मानधन याप्रमाणे नियुक्त करता येईल. शिबिराचे ठिकाणी आवश्यकतेनुसार रू. २०००/- च्या मानधनावर तज्ञ व्याख्यात्यांची व्याख्याने देखील आयोजित करता येतील.

७. <u>शिबिराकरिता मैदानसेवक</u>

मैदानात खेळाचे साहीत्य उपकरणे आणणे नेट लावणे मैदानाची साफसफाई इ. साठी मैदान सेवकाची आवश्यकता असते. त्यानुसार प्रत्येक खेळाकरिता एक याप्रमाणे १५ शिबिरे वर्षातून दोनवेळा होतील, अशी एकूण ३० शिबिरे होतील. या प्रत्येक शिबिराकरिता एक याप्रमाणे ३० मैदानसेवकाची नियुक्ती करता येईल. मैदानसेवकास १५ दिवसाकरीता (एक शिबिर) रु.५,०००/- याप्रमाणे मानधनावर नियुक्त करता येईल.

८. <u>शिबिरासाठी पात्र खेळ/क्रीडा प्रकार-</u>

<u>प्रथम टप्प्यात पुढील क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येईल.</u>

१. ॲथलेटिक्स २. जलतरण ३. कबड्डी ४.आर्चरी ५. सेलिंग ६. रोईंग ७. खो-खो ८. हॉकी ९. जिम्नॅस्टिक (रिदॅमिकसह) १०. शुटींग ११. बॅडमिंटन १२. कुस्ती १३. टेबलटेनिस १४. लॉनटेनिस १५. व्हॉलीबॉल.

९. शिबिराकरिता <u>खेळाडूंची संख्या त्यांचा तपशील :-</u>

| अ. क्र. | खेळ | वरिष्ठ गटातील खेळाडूंची संख्या | | शालेय १७ वर्षा खालील गट | | शालेय १९ वर्षा खालील गट | | एकूण | | एकूण खेळाडू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | |
| १ | ॲथलेटिक्स | ५४ | ५४ | ४० | ४० | ५४ | ५४ | १४८ | १४८ | २९६ |
| २ | जलतरण | ४४ | ४४ | ४४ | ४४ | ४४ | ४४ | १३२ | १३२ | २६४ |
| ३ | कबड्डी | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ३६ | ३६ | ७२ |
| ४ | आर्चरी | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | २४ | २४ | ४८ |
| ५ | सेलिंग | ५ | ५ | | | | | ५ | ५ | १० |
| ६ | रोईंग | ४ | ४ | | | | | ४ | ४ | ८ |
| ७ | खो-खो | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ३६ | ३६ | ७२ |
| ८ | हॉकी | १८ | १८ | १८ | १८ | १८ | १८ | ५४ | ५४ | १०८ |
| ९ | जिम्नॅस्टिक्स (रिदॅमिकसह) | १४ | १६ | ७ | १० | १४ | १६ | ३५ | ४२ | ७७ |
| १० | शूटींग | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ९ | ९ | १८ |
| ११ | बॅडमिंटन | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १५ | १५ | ३० |
| १२ | कुस्ती | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | २४ | २४ | ४८ |
| १३ | टेबलटेनिस, | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १५ | १५ | ३० |
| १४ | लॉनटेनिस | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १५ | १५ | ३० |
| १५ | व्हॉलीबॉल | १२ | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ३६ | ३६ | ७२ |
| | **एकूण** | **२०९** | **२११** | **१७९** | **१८२** | **२००** | **२०२** | **५८८** | **५९५** | **११८३** |

| | | |
|---|---|---|
| **एकूण :-** | **मुले ५८८+ मुली ५९५** | **= ११८३** |
| **मार्गदर्शक :-** | | **= ३०** |
| **मैदानसेवक :-** | | **= ३०** |
| **संघटनाचे व शासकीय अधिकारी** | | **= २७** |
| | **एकूण** | **= १२७०** |

**१०. अनुदानाच्या बाबी -**

| | | |
|---|---|---|
| i | निवास खर्च<br>(१२७०X रु. १५०X३० दिवस) | - रु.५७,१५,०००/- |
| ii | भोजन खर्च<br>(१२७०X रु. २००X३० दिवस) | - रु.७६,२०,०००/- |
| iii | पूरक आहार<br>(११८३ X रु. ५०X३० दिवस) | - रु.१७,७४,५००/- |
| iv | क्रीडा गणवेश व ट्रॅक सूट<br>(१२१३ Xरू १५००प्रति (गणवेश व सूट) | - रु.१८,१९,५००/- |
| v | क्रीडा साहित्ये व प्रशिक्षण उपकरणे<br>(५००००X१५ खेळ प्रकारासाठी) | - रु. ७,५०,०००/- |
| vi | क्रीडांगण देखभाल खर्च.<br>(२५०००X१५ खेळ प्रकारासाठी) | - रु. ३,७५,०००/- |
| vii | मैदानसेवक व सादिल खर्च.<br>(२५०००X१५ खेळ प्रकारासाठी)<br>**(मैदान सेवकास १५ दिवसाकरीता रु.५,०००/- प्रमाणे)** | - रु. ३,७५,०००/- |
| viii | प्रशिक्षक व क्रीडातज्ञांचे मानधन<br>(मुख्य मार्गदर्शक -रु.२०,०००/-<br>सहाय्यक मार्गदर्शक- रु.१५,०००/-)<br>(रु.३५०००X३० खेळ प्रकारासाठी) | - रु.१०,५०,०००/- |
| ix | तज्ञांची व्याख्याने<br>(५ तज्ञXरु.२०००X१५ खेळ प्रकारासाठी) | - रु. १,५०,०००/- |
| | **एकूण** | **- रु.१,९६,२९,०००/-** |

**११. शिबिर आयोजनासाठी मार्गदर्शक तत्वे खालील प्रमाणे राहतील.**

i. पूरक आहार केवळ खेळाडूंना अनुज्ञेय राहील तर क्रीडा गणवेश खेळाडू व मार्गदर्शक यांना अनुज्ञेय राहील.

ii. निवासासाठी राज्य शासनाची क्रीडा संकुले / शैक्षणिक संस्था येथील वसतीगृहे प्राथम्याने वापरावीत.

iii. मैदान सेवक नियुक्तीबाबत व इतर खर्चाच्या बाबी याबाबत प्रशिक्षण शिबिर होणाऱ्या जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी निर्णय घेतील.

iv. १५ खेळ प्रकारांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी आवश्यक असणारे क्रीडा साहित्य, क्रीडा गणवेश व ट्रॅक सूट इत्यादी बाबी आयुक्त / संचालक यांनी उपलब्ध करुन संबंधित शिबिर स्थळी पाठवावे.

v. शिबिराचे आयोजन वर्षातून दोन वेळा प्रत्येकी १५ दिवसासाठी करण्यात यावे. शिबिराचा कालावधी हा संबधित खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धेपूर्वी सोडून असावा.

अनुदानाच्या बाबी अंदाजित स्वरुपाच्या असून त्यानुसार दर्शविलेला खर्च करताना प्रचलित वित्तीय नियमानुसार विहित कार्य प्रणाली व इतर तांत्रिक बाबींची पूर्तता करुन अंदाजित स्वरुपाच्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक राहील.

आयुक्त / संचालक क्रीडा व युवक सेवा यांनी पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध असल्याची खात्रीकरुनच शिबिराचे स्थळ निश्चित करुन अनुदान मंजूरीसाठी कार्यवाही करावी. या प्रयोजनार्थ त्यांना नियंत्रक अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येते आहे.

आयुक्त / संचालक क्रीडा व युवक सेवा यांनी मंजूर केलेल्या अनुदानासाठी शिबिर स्थळाचे संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

या प्रयोजनार्थ होणारा खर्च पुढील लेखाशिर्षामधून त्या-त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा. २२०४- क्रीडा व युवक सेवा, १०४-क्रीडा व खेळ-(०९)-खेळाडूंना शिष्यवृत्या व पुरस्कार (०९) (१६) राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन (योजनांतर्गत) (२२०४-५६२६)

हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील व पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १४२/व्यय-५ दिनांक २०.२.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२१४१२४११६८५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.02.14 12:50:13 +05'30'

(रा.चं.पाटील)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई,
४. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा व परिक्षा ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
७. नियोजन विभाग (का.१४७१ )मंत्रालय,मुंबई
८. वित्त विभाग ( व्यय-५),मंत्रालय,मुंबई
९. सर्व उपसंचालक,क्रीडा व युवकसेवा (संचालनालयमार्फत),
१०. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयमार्फत),
११. सर्व एकविध खेळांच्या संघटना (आयुक्त क्रीडा व युवक सेवा, संचालनालय यांच्या मार्फत)
१२. ग्रंथपाल,विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१३. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१४. मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१५. निवड नस्ती (क्रीयुसे-१,क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३)